# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः23.07.2025** **वारःबुधवार**

•पंतप्रधान आजपासून ब्रिटन आणि मालदीवच्या दौऱ्यावर

•२००६च्या मुंबई उपनगरी रेल्वे बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींच्या निर्दोष मुक्ततेच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाला राज्य सरकारचं सर्वोच्च न्यायालयात आव्हान

•गडचिरोलीत विविध प्रकल्पांचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन आणि पायाभरणी

•नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या धर्तीवर राज्यात “कृषी समृद्धी योजना” राबवणार

आणि

•महिलांच्या क्रिकेटमध्ये भारताचा इंग्लंडवर २-१ असा विजय

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ब्रिटन आणि मालदीवच्या दौऱ्यावर रवाना होत आहेत. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात पंतप्रधान मोदी ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्यासमवेत द्विपक्षीय चर्चा करणार आहेत; तसंच ब्रिटनचे राजे चार्ल्स यांचीही ते भेट घेतील, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिस्री यांनी काल नवी दिल्लीत बातमीदारांना सांगितलं. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात पंतप्रधान मोदी मालदीवच्या दौऱ्यावर जाणार आहेत. २६ जुलैला मालदीवच्या ६०व्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित राहणार आहेत. या भेटीत पंतप्रधान मोदी मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईज्जु यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत, असं मिस्री यांनी सांगितलं.

**<u>संसद</u>**

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये कालही विविध मुद्द्यांवरून गदारोळ झाला; त्यामुळे कामकाज आधी दोनवेळा आणि त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेत सभापती ओम बिरला यांनी प्रश्नोत्तरांचा तास सुरू केल्यावर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी ऑपरेशन सिंदूर आणि बिहारमधलं मतदार याद्यांचं सखोल पुनरिक्षण या विषयांवर चर्चेची मागणी करत घोषणाबाजी सुरु केली. राज्यसभेतही विविध मुद्द्यांवरून झालेल्या गदारोळामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं.

**<u>उच्चन्यायालयआव्हान</u>**

मुंबईत उपनगरी रेल्वेगाड्यांमध्ये २००६मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट खटल्यातल्या सर्व १२ आरोपींना निर्दोष मुक्त करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. त्यावर उद्या म्हणजे २४ जुलै रोजी सुनावणी होणार आहे. उच्च न्यायालयानं या प्रकरणातील सर्व आरोपींबाबतचा सत्र न्यायालयाचा निकाल रद्द करून त्यांची तातडीनं सुटका करण्याचे आदेश सोमवारी दिले आहेत.

**<u>सर्वोच्चन्यायालय</u>**

विधिमंडळांनी संमत केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राष्ट्रपती किंवा राज्यपालांना कालावधी निश्चित करुन देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिलेलं विचारणा पत्र सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीला घेतलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने काल त्यावर केंद्र आणि सर्व राज्य सरकारांना नोटिसा जारी केल्या. तमिळनाडू विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांवर स्वाक्षरी करायला राज्यपालांनी विलंब केल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं हा निवाडा दिला होता. विधीमंडळानं संमत केलेलं विधेयक राज्यपालांनी पुनर्विचारासाठी परत पाठवल्यानंतर विधिमंडळात दुसऱ्यांदा संमत होउन आलं; तर ते राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवता येणार नाही. तसंच या विधेयकावर ३ महिन्यांच्या मुदतीत कार्यवाही झाली नाही तर राज्यपालांची संमती गृहित धरली जाईल असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं होतं. या निकालासंदर्भात संवैधानिक तरतुदींचा सल्ला मागणारं पत्र राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी घटनेच्या कलम १४३ नुसार सर्वोच्च न्यायालयाला पाठवलं आहे.

**<u>मुख्यमंत्री गडचिरोली</u>**

पोलाद निर्मितीचं केंद्र होण्याच्या दिशेनं गडचिरोलीची वाटचाल सुरू असून या उद्योगातून इथल्या सामान्य नागरिकांच्या जीवनात परिवर्तन घडत आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. गडचिरोली जिल्ह्यातील कोनसरी इथं लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेडच्या एलएमईएल विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाली; त्यावेळी ते बोलत होते. गडचिरोलीच्या नैसर्गिक संपत्तीचा विनाश न करता

विकास साधण्याला सरकारचं प्राधान्य असेल; पुढील काही वर्षात गडचिरोली राज्यातील पहिल्या क्रमांकाचा जिल्हा होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले.....

**<u>बाईट</u>**

हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील एक कोटी वृक्ष लागवडीचा प्रारंभही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला.

**<u>कृषी योजना</u>**

कृषी यांत्रिकीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, तसंच पाण्याचा सुयोग्य आणि किफायतशीर वापर करण्यासाठी, "नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या" धर्तीवर, राज्यात "कृषि समृद्धी योजना" राबवण्यात येणार आहे. या योजनेत दरवर्षी सुमारे पाच हजार कोटी रुपये याप्रमाणे आगामी पाच वर्षासाठी २५ हजार कोटी रूपयांची गुंतवणूक करण्यात येणार असल्याचं कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी काल सांगितलं. शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्मिती करणं आणि त्याद्वारे शेतकऱ्यांचा शाश्वत विकास आणि त्यांचं आर्थिक सक्षमीकरण करणं हा या योजनेचा उद्देश आहे. ही योजना डीबीटी अर्थात थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे राबवली जाणार आहे.

**<u>इंट्रोबाईट</u>**

**<u>रत्नागिरीआंबा-कोनकर-माधवी</u>**

रत्नागिरी जिल्ह्यातील हापूस आंब्याला एक जिल्हा एक उत्पादन योजनेमध्ये सुवर्णपदक मिळालं आहे. त्या संदर्भात रत्नागिरीच्या जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अजिंक्य आजगेकर यांनी आकाशवाणीला अधिक माहिती दिली.....

बाईट – आजगेकर

वाढदिवस-महासंवाद-ptcनाशिक-माधवी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस काल विविध सामाजिक उपक्रमातून साजरा करण्यात आला. या पार्श्वभूमीवर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी राज्यातल्या शेतकऱ्यांसाठी ‘कृषी समृद्धी योजना’ जाहीर केली. नाशिकमध्ये पत्रकार परिषदेत त्यांनी याबाबत माहिती दिली. कौशल्य, रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता विभागाने काल राज्यव्यापी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचं आयोजन केलं होतं. यात ५७ हजार तरुणांनी नोंदणी केली; आणि यातून २७ हजार तरुणांना एकच दिवशी रोजगार मिळाला, अशी माहिती कौशल्य, रोजगार आणि उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काल मुंबईत दिली. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसाचं औचित्य साधून काल राज्यभरात विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचं आयोजनही करण्यात आलं होतं; तसंच काही ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आलं. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाटचालीचा वेध घेणाऱ्या ‘महाराष्ट्र नायक’ या विशेष कॉफी टेबल बुकचं प्रकाशनही काल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे हस्ते राजभवनात करण्यात आलं.

**<u>महिला क्रिकेट</u>**

तीन सामन्यांच्या महिला एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेतील शेवटच्या सामन्यात काल भारतानं इंग्लंडचा १३ धावांनी पराभव केला आणि मालिका २-१ अशी जिंकली. नाणेफेक जिंकल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघानं दमदार फलंदाजी करत, निर्धारित ५० षटकांत ५ बाद ३१८ धावा केल्या. भारताची कर्णधार हरमनप्रीतने ८४ चेंडूत १०२ धावा केल्या. या आधी दोन्ही संघांनी प्रत्येकी एक एक सामना जिंकल्यानं हा अंतिम सामना अतिशय चुरशीचा झाला. इंग्लंडच्या संघाला ३१९ धावांचं लक्ष्य गाठताना ४९ षटकं आणि पाच चेंडूत ३०५ धावा करता आल्या. भारताच्या क्रांती गौडनं सहा बळी घेतले. हरमनप्रीतच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिला सामनावीर आणि मालिकावीर घोषित करण्यात आलं.

**<u>क्रिकेट</u>**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना आज मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड इथं होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी ३:३० वाजता सुरू होईल. या मालिकेत भारत १-२ नं पिछाडीवर आहे.

**<u>पाऊस</u>**

सोलापूर जिल्ह्याच्या अनेक भागात काल पावसाने हजेरी लावली. त्यामुळे खरीपाच्या पीकांना जीवदान मिळालं आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यातही काल जोरदार पाऊस पडला; परभणीसह काही भागात मुसळधार पावसामुळे खरिपाच्या पिकांचं नुकसान झालं.

**<u>हवामान</u>**

येत्या चोवीस तासांत कोकणातील बहुतांश ठिकाणी मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा, तर मराठवाडा, विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**